सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कालमर्यादीत** क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/ 1511

प्रति, दिनांक :- 10 JUN 2026

**प्राचार्य,**

सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र पदविका संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२६/२०१ दिनांक २५/५/२०२६.

२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१३४० दिनांक २६/५/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेची माहिती अचूक व अद्ययावत असने आवश्यक आहे. सदर माहितीशी संबंधीत आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करुन माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये या कार्यालयास कळविलेले आहे. सदर विषयाबाबत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सूचना संदर्भ क्र. २ च्या पत्रासोबत जोडलेल्या आहेत.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती ऑनलाईन प्रणालीवर अद्ययावत करुन आवश्यक कागदपत्रासह दिनांक ५/६/२०२६ पर्यंत या कार्यालयात आवश्यक मान्यतेच्या पत्रासह प्रत्यक्ष उपस्थित राहून या कार्यालयाच्या लॉगिन मधून अद्ययावत करुन घेण्याबाबत कळविले होते. परंतू अद्यापही काही संस्थांनी या कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्रवेशाची माहिती (Intake Approval) अद्ययावत केलेली नाही.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांना https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी Diploma Intake Approval २०२६-२७ या शिर्षाखाली (टॅबव्दारे) ऑनलाईन प्रणालीची लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरुन या कार्यालयात आवश्यक कागदपत्रासह प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती **दिनांक १७/६/२०२६ पर्यंत अद्ययावत करुन घ्यावी.** मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास किंवा दिनांक १७/६/२०२६ पर्यंत अद्ययावत न केल्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे प्राचार्य यांची राहतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. वि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती